महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई
DIRECTORATE OF FORENSIC SCIENCE LABORATORIES, MUMBAI
विदयानगरी,हंसभुग्रा मार्ग, कलीना,सांताक्रुझ (पूर्व) मुंबई - 400 098.
VIDYANAGARI, HANS BHUGRA MARG, KALINA, SANTACRUZ (EAST), MUMBAI-400 098
दूरध्वनी क्र. ०२२-२६६७०७५५/५८/९६५
Tel. : 022-26670755/58/965
Email id : dir.fsl@maharashtra.gov.in

जा. क्र. मुं/गो/४९०/२०२४ दिनांक:१२/०८/२०२४

# शुद्धीपत्रक

*गट-क या संवर्गातील पदांची सरळसेवा भरतीसाठी जाहिरात क्रमांक १, सन-२०२४*

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, नांदेड, कोल्हापूर, चंद्रपूर, रत्नागिरी, धुळे, ठाणे व सोलापूर प्रयोगशाळेतील **गट क संवर्गातील** सरळसेवेतील १२५ रिक्त पदांसाठी पदभरतीसाठी दिनांक ०५/०२/२०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६ क दिनांक २७/०२/२०२४ नुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गाकरिता आरक्षणाची तरतुद विहित करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील तरतुदी वरील संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातीकरिता लागू आहेत. तसेच संचालनालयाच्या दिनांक १० जुलै, २०२४ रोजीच्या शुद्धीपत्रकानुसार खुला (अराखीव) तसेच आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. दरम्यान काही उमेदवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदी च्या आधारे इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करून सदर जाहिरातीकारिता इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरून शासन पत्र गृह विभाग क्रमांक एफएसएल-०४२३/प्र.क्र. २९३/पोल-४ दिनांक १२.०८.२०२४ अनुसार दिलेल्या सूचना विचारात घेऊन खुला (अराखीव) व आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी इतर मागासवर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा दावा उपलब्ध करून खाली दिलेल्या विहित मुदतीत विकल्प सादर करण्याची संधी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | विहित कालावधी |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि. 14.08.2024 ते दि.18.08.2024 |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने विहित परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. 14.08.2024 ते दि.18.08.2024 |

१. यासाठी ज्या अराखीव व आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे व ज्यांच्याकडे इतर मागास प्रवर्गाचे विहित प्रधीका-याचे जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमी लेयर (NCL) या प्रवर्गात मोडत असल्याचे विहित प्रधीका-याचे वैध प्रमाणपत्र आहे व त्यांनी https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक प्रविष्ट करून त्यांच्या अर्जामध्ये उक्त प्रवार्गा संबंधित विहित तपशील प्रविष्ट करावे, जेणेकरून पात्र उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ घेता येईल.

१.१ यापूर्वी खुला तसेच आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गाकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना आपल्या आरक्षणाच्या प्रवर्गाबाबत सुधारणा करावयाची झाल्यास त्यांनाही उपरोक्त कालावधीमध्येच सुधारणा करणे आवश्यक आहे. सदरील लिंक फक्त अराखीव व आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातील उमेदवारांकरिता खाली नमूद कालावधीसाठी उपलब्ध राहील.

१.२ तथापि, ज्या उमेदवारांकडे त्यांच्याकडील कुणबी नोंदीच्या आधारे इतर मागास वर्गाचे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे अशा इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता नव्याने अर्ज सादर करण्याची संधी खालील प्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. जाहिरात क्र.१, सन-२०२४ यामधील सर्व अटी व शर्ती तसेच शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा हया मूळ जाहिरातीप्रमाणेच जशाच तशा लागू राहतील.

| अ.क्र. | तपशिल | विहित कालावधी |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि.19.08.2024 ते दि.23.08.2024 |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने विहित परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि.19.08.2024 ते दि.24.08.2024 |

२. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गाचे अथवा इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) दावा केलेल्या उमेदवारांनी सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) विकल्प सादर न केल्यास सदर उमेदवारांचा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच उपरोक्त कालावधीनंतर याबाबत करण्यात आलेल्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

3. ज्या उमेदवारांनी महिला, पदवीधर/ पदवीकाधारक अंशकालीन, प्रकल्पग्रस्त व खेळाडू या समांतर आरक्षण प्रवर्गातून यापूर्वी आवेदन सादर केले आहेत. सदर आरक्षित पदे रद्द झाल्यामुळे मूळ जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अराखीव पदाच्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या सदर उमेदवारांचा अराखीव पदासाठी विचार करण्यात येईल.

४. उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.**

५. दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

**स्वाक्षरीत/-**
संचालक तथा सदस्य सचिव, निवड समिती
न्या.वै.प्र.शाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**स्थळ :- मुंबई.**
**दिनांक :- १२.०८.२०२४**